**International Research Journal of Commerce and Law**
Volume 10 Issue 01, January 2022 ISSN: 2349-705X Impact Factor: 6.843
Journal Homepage: http://ijmr.net.in, Email: irjmss@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal

# "चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानतेचे – एक चिकित्सक अध्ययन"

**Prof.P.S.Meshram**
N.H.College Bramhapuri
Email ID :- meshram.prashant99@gmail.com
Mobile No. : 8459489113

**Guide**
Dr.S.S.Kawale
M.Com., M.A.(Eco.), Ph.D. D.B.M., G.D.C. & A.
Pro. Vice Chancellor
Gondwana University, Gadchiroli

## १.१ प्रस्तावना :

भारत स्वतंत्र झाल्यानंतर काही दिवसातच महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. आणि महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती सोबतच चंद्रपूर जिल्हयाची निर्मिती झाली. चंद्रपूर जिल्हा हा नैसर्गिक साधनसंपत्तीने परिपूर्ण जिल्हा आहे.

सन १९१४ मध्ये मॅक्लेगन समितीने मध्यवर्ती बँकांच्या गरजा पुर्ण करण्याकरिता त्यांच्यावर योग्य ते नियंत्रण ठेवण्याकरिता आणि त्यांच्या कार्यात सुसूत्रिकरण आणण्यासाठी राज्य सहकारी बँकेची आवश्यकता व्यक्त केली.

महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार चंद्रपूर जिल्हयाचे विभाजन झाल्यानंतर दिनांक ०८/११/१९८५ ला चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे दोन जिल्हा बँकेत (गडचिरोली व चंद्रपूर) विभाजन होऊन स्वतंत्ररित्या चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चंद्रपूर बँक अस्तित्वात आली. चंद्रपूर जिल्हयामध्ये एकुण १५ तालुके असून ८० शाखा व ११ पे ऑफिस सह ९१ शाखा जिल्हयात आहेत आणि ६ विभागीय कार्यालय आहेत. तसेच २५ शाखेमधून एटीएम सेवा देण्यात येत आहे. अशा प्रकारे संपूर्ण जिल्हयात बँकेचे जाळे पसरलेले आहे. आपली बँक जिल्हयात सहकार क्षेत्रातील अग्रणी असून ग्रामीण व दुर्गम भागातील प्रामुख्याने महात्मा- गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना शेतकऱ्यांना अतिवृष्टी अंतर्गत मिळणाऱ्या आर्थिक मदतीचे वाटप तेंदू पत्ता व आदिवासी विकास मंडळातील आर्थिक सहाय्याचे वाटप, विद्युत बिले, शिक्षकांचे पगार, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना यासारख्या शासकीय योजनांची कामे चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत केली जाते.

**International Research Journal of Commerce and Law**
Volume 10 Issue 01, January 2022 ISSN: 2349-705X Impact Factor: 6.843
Journal Homepage: http://ijmr.net.in, Email: irjmss@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal

या बँकेमध्ये एकुण ६८० कर्मचारी असून २२१ कर्मचारी प्रशिक्षीत आहेत व आवश्यकतेनुसार अधिकारी व कर्मचाऱ्यांना विविध सहकारी प्रशिक्षण संस्थामार्फत प्रशिक्षण दिले जात आहे.

**१.२ विषयाची व्याप्ती :**

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समाधानतेचे अध्ययन करणे या विषयाची व्याप्ती जरी मोठी नसली तरी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेने अध्ययन केल्यामुळे शासकीय व निमशासकीय विभागासाठी सुध्दा हे अध्ययन उपयुक्त आहे. त्यामुळे विषयाची व्याप्ती खुप मोठी आहे.

**१.3 अभ्यासाचे क्षेत्र :**

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेचे अध्ययन करणे. चंद्रपूर जिल्हयामध्ये एकुण १५ तालुके असून ८० शाखा आणि ११ पे ऑफीस व ६ विभागीय कार्यालय असून यामध्ये ६८० अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यसमाधानतेचे अध्ययन करणे हा या विषयाचा महत्वाचा भाग आहे.

**१.४ विषयाचे अवलोकन :**

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेअंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना त्यांच्या कामापासून मिळणाऱ्या कार्य समाधानतेचे अवलोकन करणे.

**२. विषयाचे महत्व :**

- चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानतेचा त्यांच्या कार्यक्षमतेवर कसा परिणाम होतो.
- अधिकारी व कर्मचारी आपल्या कार्याबद्दल समाधानी आहेत की नाही हे जाणून घेणे.
- चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या आर्थिक सोई सवलतींचा त्यांच्या कार्यसमाधानावर कसा परिणाम होतो.

- अधिकारी व कर्मचारी यांना मिळणाऱ्या वेतनामुळे त्यांच्या राहणीमानात, त्यांच्या आर्थिक बाबीत वाढ झाल्याचे दिसून येते.

**३. संशोधनाचे उद्देश :**

कोणतेही संशोधन कार्य करण्यासाठी काही उद्देश निश्चित करावे लागतात. या अध्ययनासाठी खालील उद्देश निश्चित करण्यात आलेले आहेत.

- चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कौटूंबिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
- अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्याविषयी मत जाणून घेणे.
- चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानतेचा त्यांच्या कार्यक्षमतेवर कसा परिणाम होतो हे जाणून घेणे.
- बँकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सोई सवलतीबद्दल व वेतनाबद्दल अध्ययन करणे.
- व्यवस्थापनाशी व इतर व्यक्तीशी असणारे संबंध व त्याचा त्यांच्या कार्यावर होणारा परिणाम जाणून घेणे.
- बँकेतील दैनंदिन कामाव्यतिरीक्त जास्तीच्या कामाचा त्यांच्या कार्यसमाधानतेवर होणारा परिणाम जाणून घेणे.
- बँकेतील कर्मचाऱ्यांचा राहणीमानाचा दर्जा व समाजातील स्थान याबद्दल जाणून घेणे.

**४. संशोधनाची गृहीतके :**

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्य समाधानतेचे अध्ययन करण्यासाठी २००० ते २०१२ या कालावधीमध्ये अभ्यासाची गृहितके पुढिल प्रमाणे.

- अधिकारी व कर्मचारी यांचा व्यवस्थापन, बँकेचे ग्राहक वर्ग, व्यवस्थापन आणि इतर व्यक्तीशी असलेल्या परस्पर संबंधाचा त्यांच्या कार्यसमाधानतेवर होतो.

- ❖ चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील अधिकारी व कर्मचारी यांना मिळणाऱ्या सोई सवलतीच्या त्यांच्या कार्यसमाधानतेवर परिणाम होतो.
- ❖ बँकेतील अधिकारी व कर्मचारी यांना मिळणारे उत्पन्न, होणारा खर्च, मिळणारी कार्यसमाधानता आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध आहे.
- ❖ दैनंदिन कामाव्यतिरिक्त अधिकारी यांना देण्यात येणाऱ्या जास्तीच्या कामाचा त्याच्या कार्यसमाधानतेवर परिणाम होतो.
- ❖ बँकेतील कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर कार्यसमाधानतेचे परिणाम झालेले आहेत.

**५. संशोधन पद्धती :**

या संशोधनासाठी चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील ५० टक्के शाखा व ५० टक्के अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

**अ) प्राथमिक तथ्य संकलन :**

प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची तयार करण्यात येईल व मुलाखत अनुसूचिद्वारे चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानतेविषयी माहिती प्राप्त केली जाईल.

**ब) दुय्यम तथ्य संकलन :**

दुय्यम प्रकारची माहिती वेगवेगळ्या स्त्रोताद्वारे गोळा करण्यात येईल. जसे चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अहवाल, अर्धवार्षिक अहवाल, मासिक इत्यादी माध्यमाद्वारे दुय्यम स्वरूपाची माहिती गोळा केली जाईल. २००० ते २०१२ या कालावधीमधील.

निष्कर्ष :

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्य समाधानतेचा त्यांच्या कार्यक्षमतेवर आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक पातळीवर कसा परिणाम होतो हे अभ्यासणे.

८. संदर्भ ग्रंथ सूची :

१) भारतातील सहकार (Co-Operation in India) : डॉ.गंगाधर व्ही. कायदे–पाटील, चैतन्य पब्लीकेशन, नाशिक–१३

२) Co-Operation in India and Board : Dr. K.P.Bhatnagar, Dr.N.S.Nigam, Kishor Pub. Kanpur

३) सहकारीता, सिध्दांत, इतिहास आणि व्यवहार: रघुवंश देव बेदी, लॉयल पब्ली मेरठ

४) १९७८ शैक्षणिक संशोधन मुलतत्वे : ग.स.मुळे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर

५) १९८६, संशोधन पध्दती प्रक्रिया व अंतरंग : दु.का.संत, विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे

६) चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची माहिती पुस्तीका.

७) चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे वार्षिक अहवाल (२००० ते २०१०)